




दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे








वर्ष ६ । अंक ३० । बुधवार २१ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainikaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


### विखे-थोरात विरुद्ध शिंदे-लंके यांचे पॅनल उतरणार मैदानात

# जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी आणखी पाच जागा बिनविरोध, बारा जागांसाठी होणार चुरशीची लढत

**अर्जमाघारीच्या आज शेवटच्या दिवशी एकुण ९ जागा बिनविरोध । सर्वपक्षीय बैठकीतील चर्चा अखेर निष्फळ**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत आज, बुधवारी अर्जमाघारीच्या शेवटच्या दिवशी पाच जागा बिनविरोध झाल्या असून, त्यामुळे एकूण नऊ जागाश बिनविरोध होऊन बारा जागांसाठी निवडणूक होणार हे नक्की झाले आहे. यापूर्वी माजी खासदार डॉ. सुजय विखे, रणजितसिंह देशमुख (संगमनेर), शंकरराव (नेवासा) गडाख व चंद्रशेखर घुले (शेवगाव) हे चारजण बिनविरोध झाले होते.

आज, बुधवारी अर्जमाघारीच्या शेवटच्या दिवशी आमदार मोनिकाताई राजळे (पाथर्डी), सचिन जगताप (नगर), करण ससाणे (श्रीरामपूर), बिपीन कोल्हे (कोपरगाव) व राजश्री घुले (शेवगाव) अशा पाच जागा बिनविरोध झाल्या. पारनेरमध्ये खासदार नीलेश लंके व राहुल शिंदे यांच्यात लढत होणार आहे. राम शिंदे यांचे कर्जत-जामखेडमधील उमेदवार त्यांनी जाहीर केलेले आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी मागे घेण्यासाठी आज बुधवार (दि.२१) रोजी शेवटची ■ पान ४ वर

### बैठकीतील ना. राम शिंदेंचे आवाहन प्रत्यक्षात आले नाहीच

काल झालेल्या बैठकीत ना. शिंदे यांनी बुधवारी पालकमंत्री राधाकृष्ण विखे दुपारी १२ वाजता बँकेच्या नवनिर्वाचित २१ संचालकांची नावे जाहीर करतील. त्यानंतर ज्यांची नावे या यादीत नाही त्यांनी तातडीने आपली उमेदवारी दुपारी ३ वाजेपर्यंत मागे द्यावी, असे आवाहन पत्रकार परिषदेत केले होते. परंतु प्रत्यक्षात तसे काही झाले नाही.

### विखे-थोरात यांच्या सहमती एक्सप्रेसला, ना. शिंदे व खा. लंके यांच्याकडून ब्रेक?

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्यादृष्टीने मंत्री विखे व थोरात यांच्यात सहमती एक्सप्रेस झाली होती. मात्र, ना. सभापती शिंदे व खा. नीलेश लंके यांनी सुरुवातीलाच निवडणुकीचा आग्रह धरला व पॅनल उतरविण्याची तयारी केली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीकवर निवडणूक बिनविरोध करण्याच्या दृष्टीने सर्वपक्षीय बैठकीत नेत्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. परंतु सर्वपक्षीय बैठक होऊनही निवडणूक बिनविरोधचे प्रयत्न असफल ठरले. विखे-थोरात यांच्या सहमती एक्सप्रेसला ना. शिंदे व खा. लंके यांच्याकडून ब्रेक लावण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

### वाईट विचारांच्या प्रवृत्तींचा विनाश होतो

# चुकीच्या मार्गाने जाऊ नका - आमदार संग्राम जगताप

**। तुळजाभवानी माता मंदिरात हिंदू धर्मसभा व रावण दहन उत्साहात । विचार भारतीचे संस्थापक राजाभाऊ मुळे यांना 'शिवशंभू हिंदू धर्मरक्षक पुरस्कार' प्रदान**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–**दसरा सणानिमित्त पाईपलाइईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिर देवस्थानच्या वतीने हिंदू धर्मसभा आणि रावण दहन सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी विचार भारतीचे संस्थापक राजाभाऊ मुळे यांना त्यांच्या सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते 'शिवशंभू हिंदू धर्मरक्षक पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला भाविक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते रावण दहन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी दसरा सणाचा आनंद घेतला. धार्मिक परंपरा, संस्कृती आणि सामाजिक विचारांची देवाणघेवाण घडवून आणणाऱ्या या सोहळ्यात हिंदू धर्मसभेच्या माध्यमातून सामाजिक व धार्मिक कार्याचा गौरव करण्यात आला.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, दसरा सणाला रावणाच्या पुतळ्याचे दहन करण्यामागे त्याच्या चुकीच्या विचारांचा आणि कृत्यांचा विनाश हा संदेश आहे. रावणाला त्या काळात बलाढ्य शक्ती म्हणून ओळखले जात होते; मात्र त्याचे विचार आणि कृती चुकीची होती. सीतेचे अपहरण करून त्याने चुकीचे पाऊल उचलले आणि प्रभू श्रीरामचंद्रांनी त्याच्या वाईट प्रवृत्तीचा अंत केला. त्यामुळे प्रत्येकाने चुकीच्या विचारांपासून दूर राहून चांगल्या मार्गाने वाटचाल केली पाहिजे. वाईट विचारांच्या प्रवृत्तींचा अखेर विनाश होत असतो, ■ पान ४ वर

# न्यायालयाच्या आदेशानंतरही वाहन अन् मोबाईलसाठी चिचोंडी पाटीलच्या सरपंचाचे पोलीस ठाण्याचे हेलपाटे

**चिरीमिरीसाठी टाळाटाळ होत असल्याचा सरपंच शरद पवार यांचा आरोप । संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कारवाईची वरिष्ठांकडे मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील चिचोंडी पाटीलचे सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष शरद पवार यांच्यासह सहकाऱ्यांवर दाखल असलेल्या गुन्ह्याच्या तपासासाठी पोलिसांनी ताब्यात घेतलेले रेनॉल्ट काला कार हे चारचाकी वाहन व मोबाईल परत देण्यासाठी सर्व न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करूनही नगर तालुका पोलीस ठाण्याकडून चिरीमिरीसाठी टाळाटाळ होत असल्याची तक्रार सरपंच शरद पवार यांनी केली आहे. सरपंच पवार व सहकाऱ्यांवर सहा महिन्यांपूर्वी ४ मे २०२६ रोजी हा गुन्हा दाखल झालेल्या गुन्ह्याच्या तपासासाठी नगर तालुका पोलिसांकडून पवार यांच्या मालकीचे चारचाकी वाहन व मोबाईल ताब्यात घेण्यात आला होता.

या गुन्ह्याच्या तपासादरम्यान सर्व न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाचा आदेश असतानाही वाहन व मोबाईल परत मिळत नसल्याचा आरोप करत पवार यांनी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरोधात तक्रार केली आहे. चिरीमिरीसाठी वाहन व मोबाईल परत देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा गंभीर आरोप ■ पान ४ वर

### दिवसभर बसवून ठेवतात

न्यायालयाचा आदेश असतानाही संबंधित पोलीस उपनिरीक्षक पतंगे हे वाहन परत देण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप पवार यांनी केला आहे. वाहन परत घेण्यासाठी पोलीस ठाण्यात बोलावले जाते, दिवसभर बसवून ठेवले जाते आणि सायंकाळी उद्या या मग गाडी देतो असे सांगितले जाते, असे पवार यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

### अवैध धंद्यांना पाठबळ देणाऱ्यांवर कारवाई करा

नगर तालुका पोलीस ठाणे हद्दीत मटका, बिंगो, गुटखा व अवैध धंद्यांना पाठबळ दिले जात असल्याचा आरोप सरपंच पवार यांनी केला असून, अशा पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे..न्यायालयाच्या आदेशानंतरही वाहन आणि मोबाईल परत मिळत नसल्याच्या तक्रारीमुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. संबंधित प्रकरणाची चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करावी आणि वाहन व मोबाईल तातडीने परत मिळवून द्यावेत अशी मागणी शरद पवार यांनी केली आहे.

## ज्येष्ठ शिवसैनिक अंबादास पंधाडे यांचे दु:खद निधन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** दिल्लीगेट परिसरातील जेष्ठ शिवसैनिक अंबादास माधवराव पंधाडे यांचे दुःखद झाले. अहिल्यानगर जिल्ह्यासह शहरात अंबादास पंधाडे यांनी शिवसेनेच्या शाखा तयार करण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. स्वर्गवासी आमदार अनिल भैया राठोड, ज्येष्ठ शिवसैनिक श्रीराम येंडे, बाबुशेठ टायरवाले, सतीश मैड, यानी शहरातील शिवसैनिकांना मदतीला घेत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन करून सर्वात मोठे योगदान दिले. अहिल्यानगर जिल्ह्यातील आणि शहरातील शिवसेना संपूर्ण राज्यात चर्चेत आणली होती. अंबादास पंधाडे हे शिवसेनेची बुलंद तोफ म्हणून सर्वत्र परिचित होते. त्यांचे संभाषण आणि भाषण कौशल्य मोठे होते. अहिल्यानगर शहर महानगरपालिकेमध्ये यांनी विविध पदे भूषवली होती. नालेगाव येथील अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व राजकीय शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील मंडळी उपस्थित होते.

# एमआयडीसीच्या रेणुका माता मंदिरात रंगला 'होम मिनिस्टर'चा खेळ; ११ महिलांनी जिंकली पैठणी!

**स्त्रीशक्तीचा जागर; मनोरंजनात्मक स्पर्धांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; आकर्षक बक्षिसांची लयलूट**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या वतीने दर्शनासाठी आलेल्या महिला भाविकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'होम मिनिस्टर रंगलेला हा खेळ पैठणीचा' या मनोरंजनात्मक कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध मनोरंजनात्मक आणि बौद्धिक खेळांच्या माध्यमातून स्त्रीशक्तीचा जागर करण्यात आला. या कार्यक्रमात महिलांनी उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांची आणि कौशल्याची चुणूक दाखवली. विविध स्पर्धांमधील ११ विजेत्या महिलांना पैठणी, ३ सोन्याची नथ, मिक्सर यांसह आकर्षक बक्षिसे देण्यात आली.

श्री रेणुका माता देवस्थान परिसरात पार पडलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली वाघमारे यांनी केले. त्यांनी विविध मनोरंजनात्मक आणि बौद्धिक खेळांच्या माध्यमातून महिलांना स्पर्धेत सहभागी करून घेतले. प्रत्येक फेरीत महिलांचा उत्साह वाढत होता. विविध खेळांमधील आव्हाने स्वीकारत महिलांनी स्पर्धेचा मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमाच्या निमित्ताने मंदिर परिसरात महिलांची मोठी गर्दी झाली होती. संपूर्ण परिसर उत्साहाने आणि आनंदाने गजबजून गेला होता.

संसाराच्या जबाबदाऱ्या सांभाळताना महिलांना स्वतःच्या आवडी-निवडी आणि कलागुणांसाठी फारसा वेळ मिळत नाही. हीच बाब लक्षात घेऊन महिलांना मनोरंजनाची संधी



उपलब्ध करून देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विविध फेऱ्यांमधून महिलांची बौद्धिक क्षमता, चातुर्य, कौशल्य आणि समयसूचकता यांची कसोटी पाहण्यात आली. प्रत्येक फेरीत सहभागी महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत कार्यक्रमात रंगत आणली.

महिलांसोबत त्यांच्या मुलांनाही काही फेऱ्यांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. त्यामुळे कार्यक्रमाला कौटुंबिक स्वरूप प्राप्त झाले. महिलांनी एकमेकींना प्रोत्साहन देत विविध स्पर्धांचा आनंद घेतला. स्पर्धेतील चुरस, मनोरंजनात्मक खेळ आणि बक्षिसांची उत्सुकता यामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.

या कार्यक्रमातील विजेत्या महिलांसाठी विविध आकर्षक बक्षिसांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्या महिलेला पैठणी, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्या महिलेला सोन्याची नथ, तर तृतीय क्रमांकाच्या विजेत्या महिलेला मिक्सरचे बक्षिस देऊन गौरविण्यात आले. याशिवाय विविध फेऱ्यांमध्ये विजयी झालेल्या महिलांनाही आकर्षक बक्षिसे देण्यात आली. प्रत्येक फेरीच्या निकालानंतर विजेत्या महिलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. कार्यक्रम पाहण्यासाठी परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. देवस्थान ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांच्या पत्नींनीही या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे आणि सचिन कोतकर यांच्या उपस्थितीत विजेत्या महिलांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. महिलांना आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून त्यांना विरंगुळा मिळावा, या उद्देशाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे महिला भाविकांनी कौतुक केले.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सिद्धी बाग बुद्ध विहारात अभिवादन

**शिक्षण, सामाजिक समता आणि मानवतेच्या मूल्यांना प्राधान्य देणे हीच महामानवांना खरी आदरांजली– नगरसेवक सुरेश बनसोडे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त अहिल्यानगर येथील सिद्धी बाग परिसरातील बुद्ध विहारात भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी भगवान बुद्धांच्या शांती, करुणा, समता आणि बंधुतेच्या विचारांचे स्मरण केले.

याप्रसंगी नगरसेवक सुरेश बनसोडे, अहिल्यानगर महानगरपालिकेचे जल अभियंता परिमल निकम, निवृत्ती आरू, प्रा. जयंत गायकवाड, विलास साठे, अमित काळे, सुहास शिरसाठ, महेश भोसले, दीपक अमृत, विशाल भिंगारदिवे, कौशल गायकवाड, अजय पाखरे, निखिल साळवे यांच्यासह विविध पदाधिकारी व अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, धम्मचक्र प्रवर्तन दिन हा भारतीय इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा आणि प्रेरणादायी दिवस आहे. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक घटनेतून त्यांनी समाजाला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवतेचा मार्ग दाखविला. भगवान गौतम बुद्धांनी दिलेला शांती, करुणा, प्रज्ञा आणि अहिंसेचा संदेश आजही समाजासाठी मार्गदर्शक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक विषमता, जातिभेद आणि अन्यायाविरुद्ध लढा देत वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाला सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखविला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेताना केवळ जयंती किंवा स्मृतिदिन साजरे करणे पुरेसे नसून, त्यांच्या विचारांचे आचरण आपल्या दैनंदिन जीवनात करणे आवश्यक आहे. समाजात बंधुभाव वाढवून शिक्षण, सामाजिक समता आणि मानवतेच्या मूल्यांना प्राधान्य देणे हीच महामानवांना खरी आदरांजली ठरेल असेही बनसोडे यांनी सांगितले.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित या अभिवादन कार्यक्रमातून भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना उजाळा देण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या महान कार्याचे स्मरण करून समताधिष्ठित समाजनिर्मितीचा संकल्प व्यक्त केला.

## दै. आकर्षण निवडक

### आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये शुक्रवारी स्त्री रोग व गर्भवती महिला मोफत तपासणी शिबिर

अहिल्यानगर- जैन सोशल फेडरेशनद्वारा संचालित आनंदऋषिजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर येथे शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मोफत स्त्री रोग, गर्भवती महिला तपासणी आणि सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात नोंदणी केल्यास गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंत, गर्भवती महिलांच्या सोनोग्राफी , रक्त तपासणी व इतर सर्व आवश्यक चाचण्या ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जाणार असून न्यूट्रिशनल मेडिसिन मोफत दिले जाणार आहेत. तज्ज्ञांकडून आहार मार्गदर्शन केले जाईल. अनुभवी स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. रवींद्र मुथा ,डॉ. तृप्ती पाटील व डॉ.प्रथमेश झेंडे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत. हॉस्पिटलमध्ये स्त्री रोगांवर प्रभावी उपचार सुविधा उपलब्ध आहेत. तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने शस्त्रक्रियाही करण्यात येतात. या उपचार सुविधांचा जास्तीत जास्त रूग्णांना लाभ मिळावा यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दुर्बिणीद्वारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, मूत्राशय काढणे, वंध्यत्व तपासणीसाठी गर्भनलिकेची ट्युबल पेटन्सी, बिजांड पेशींवरील गाठी काढणे, सिझेरियन, गर्भाशयाची पिशवी काढणे, शस्त्रक्रियेद्वारे गर्भाशय तपासणी व उपचार, नॉर्मल डिलिव्हरी, गर्भाशय स्वच्छ करणे, दुर्डिबिणीद्वारे गर्भाशयाची पिशवी काढणे, हिस्टेरोसाल्फिनजिओग्राफी, गर्भाशयाच्या आतल्या अस्तराचा तुकडा तपासणे, गर्भाशय मुखाच्या पेशींची तपासणी असे विविध उपचार व शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात केल्या जाणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे ३५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ९५० रूपये ( संपर्क : मो. ९४०५२७१८७८), सिटी स्कॅन १२५० रूपये ( संपर्क : मो. ९४०४२९९९११), एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. रात्री १ ते पहाटे ५ यावेळेत एम.आर. आय. केल्यास ७५० रूपयांची सूट दिली जाईल. ( संपर्क : मो. ९४०४२९७४११). २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅबच्यावतीने ब्लड सॅम्पल घरी येऊनही घेतले जाते. त्यामुळे रूग्णांच्या वेळेत बचत होते. (होम ब्लड सॅम्पलसाठी संपर्क : मो. ९३७३८०७८४२.). शिबिराचा जास्तीत जास्त रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१- २३२०४७३/ ७४/७५ / ७६.

### सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामकृष्ण आठरे यांचे निधन

अहिल्यानगर - जिल्हा परिषद शाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामकृष्ण बाबुराव



आठरे (वय ९०) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने आठरे कुटुंबीयांसह परिचित व आप्तस्वकीयांमध्ये शोककळा पसरली आहे. रामकृष्ण आठरे यांच्या पार्थिवावर अहिल्यानगर येथील नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व.रामकृष्ण आठरे यांनी जिल्हा परिषद शिक्षण विभागात मुख्याध्यापक म्हणून सेवा बजावली होती. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे पुत्र स्व. राजेश आठरे व प्रदीप आठरे होत. तसेच रेश्माताई आठरे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या शहराध्यक्ष तथा शहर बँकेच्या संचलिका, यांचे ते सासरे होते. गजराजचे सुरेशराव चव्हाण यांचे ते व्याही होत.

### मधुकर देशपांडे यांचे निधन

अहिल्यानगर - केडगाव येथील सेवानिवृत्त



ग्रामसेवक आणि केडगाव पेन्शनर्स असोसिएशनचे माजी सचिव मधुकर दिनकर देशपांडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यानचे वय ९४ होते. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, नात, सुना, दोन सुना, नातवंडे, पणतू असा परिवार आहे. नगर जिल्ह्यातील कान्हूर, पारनेर, वाकळी, खारेकर्जुने, दरेवाडी, नगर पंचायत या ठिकाणी त्यांनी नोकरी केली. अहिल्यानगर न्यायालयातील निवृत्त नाझर चंद्रकांत देशपांडे आणि पत्रकार रवींद्र देशपांडे यांचे वडील होते.

## बुऱ्हाणनगर देवी भवानी मंदिरात दुर्गाष्टमी होम; शुंभ-निशुंभ व महिषासुर वधाचा देखावा

**दुष्काळ निवारण व पर्जन्यवृष्टीसाठी संकल्प; तुळजापूरच्या पायी पालखी यात्रेशी संबंधित झोपडी प्रज्वलनाची परंपरा जपली**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्री क्षेत्र बुऱ्हाणनगर येथील देवी भवानी मंदिरात शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त पारंपरिक पद्धतीने दुर्गाष्टमी होम पार पडला. यानिमित्त शुंभ-निशुंभ व महिषासुर यांच्या वधाचा पौराणिक प्रसंग प्रतीकात्मक स्वरूपात साकारण्यात आला. या कथानकाला अनुसरून श्री देवीची विशेष सजावट करून देखावाही उभारण्यात आला. दुर्गाष्टमीनिमित्त विधिवत होम-हवन करण्यात आले. दुष्काळाचे संकट दूर व्हावे, समाधानकारक पर्जन्यवृष्टी व्हावी, शेतकरी सुखी व समृद्ध व्हावा तसेच रोगराई व नैसर्गिक संकटांचे निवारण व्हावे, या जनकल्याणाच्या संकल्पाने होमामध्ये आहुती अर्पण करण्यात आल्या. शुंभ-निशुंभ व महिषासुर यांच्या प्रतिकृती उभारून त्यांच्या वधाचा प्रसंग प्रतीकात्मक स्वरूपात सादर करण्यात आला. त्याच धर्तीवर श्री देवीची विशेष सजावट करण्यात आल्याने दुर्गाष्टमीशी संबंधित पौराणिक कथानक भाविकांसमोर देखाव्याच्या माध्यमातून मांडण्यात आले.

**झोपडी प्रज्वलनातून ऐतिहासिक परंपरेचे जतन**

दुर्गाष्टमी होमावेळी झोपडी प्रज्वलित करण्याची जुनी परंपराही यंदा जपण्यात आली. भगत परिवाराच्या मौखिक परंपरेनुसार, या प्रथेचा संबंध बुऱ्हाणनगरहून तुळजापूरला नेण्यात येणाऱ्या श्री देवीच्या पायी पालखी यात्रेशी आहे. पूर्वी भगत परिवारातील पूर्वज श्री देवीची पालखी घेऊन बुऱ्हाणनगरहून पायी तुळजापूरला जात असत.

त्या काळी या यात्रेस मोठा कालावधी लागत असे. प्रदीर्घ यात्रेदरम्यान घराची ओढ व आठवण मागे ठेवून देवीच्या सेवेत मन एकाग्र राहावे, या भावनेतून घराचे प्रतीक म्हणून झोपडी प्रज्वलित करण्याची प्रथा सुरू झाल्याचे भगत परिवाराकडून सांगण्यात येते. पुढील पिढ्यांनीही ही परंपरा कायम ठेवली असून दुर्गाष्टमी होमाच्या निमित्ताने आजही तिचे पालन केले जाते. श्री बुऱ्हाणनगर देवी भवानी मंदिराचे प्रमुख तथा पुजारी ॲड. विजय भगत यांच्या मार्गदर्शनाखाली दुर्गाष्टमी होम व संबंधित धार्मिक विधी पार पडले. त्यांचे पुत्र ॲड. अभिषेक भगत व सौ. कविता भगत यांनी संकल्प सोडून होमाची पूर्णाहुती दिली.

यावेळी सौ. दुर्गा भगत, सुभाष भगत, सुनंदा भगत, कुणाल भगत, ॲड. संकेत भगत, अक्षदा भगत, अजिंक्य भगत, वैभवी भगत, वेद, वेदिका यांच्यासह भगत परिवारातील सदस्य आणि देवीभक्त भाविक उपस्थित होते. दुर्गाष्टमी होम, दुष्काळ निवारण व पर्जन्यवृष्टीसाठी करण्यात आलेला संकल्प, शुंभ-निशुंभ व महिषासुर वधाचा प्रतीकात्मक देखावा, श्री देवीची विशेष सजावट आणि तुळजापूरच्या पायी पालखी यात्रेशी संबंधित झोपडी प्रज्वलनाची परंपरा ही यंदाच्या दुर्गाष्टमी सोहळ्याची प्रमुख वैशिष्ट्ये ठरली.

## न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या हस्ते कृष्णा महाराज शास्त्री भगवानगडाच्या चतुर्थ महंतपदी नियुक्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** १९५१ साली दसऱ्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक अध्यक्ष, ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांनी श्री क्षेत्र भगवानगडाची स्थापना केली. आज या गडाला स्थापन होऊन ७५ वर्ष पूर्ण होत असल्याने भगवान गडाचे हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. यावर्षी सर्वांत महत्वाचा दुधशर्करा योग म्हणजे आजच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाला स्थापन होऊन ७५ वर्षे पूर्ण होत आहेत आणि आजच्याच दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाच्या चतुर्थ मठाधिपतींची नियुक्ती झाली आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांनी आपले उत्तराधिकारी व श्री क्षेत्र भगवानगडाचे चतुर्थ महंत म्हणून ह.भ.प.श्री.कृष्णा महाराज शास्त्री यांची निवड केली होती. शास्त्रीजींनी साधारण दोन वर्षांपूर्वी ही अधिकृत घोषणा केली होती. ह.भ.प.श्री.कृष्णा महाराज शास्त्री यांनी बारा वर्षे श्री क्षेत्र भगवानगडावरील ज्ञानेश्वरी विद्यापीठामध्ये राहून महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानेश्वरी व इतर धार्मिक ग्रंथांचे अध्ययन केलेले आहे.

विद्या पारंगत झाल्यानंतर श्रीगुरु शास्त्रीजींनी त्यांना एकनाथवाडी ग्रामस्थांच्या आग्रहास्तव तेथील निरंजन संस्थानचे महंत केले होते. जवळपास तीन वर्ष ह.भ.प. श्री कृष्णा महाराज शास्त्रीजींनी निरंजन संस्थानचे महंत म्हणून काम पाहिलेले आहे. श्रीगुरु शास्त्री बाबांनी त्यांची श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत म्हणून घोषणा केल्यानंतर साधारण दोन वर्षांपूर्वी एकनाथवाडी येथून ग्रामस्थांनी ह.भ.प.श्री.कृष्णा महाराज शास्त्री यांना रथामध्ये बसवून ढोल, ताशा, टाळ, मृदंगाचा गजर आणि हरी नामाचा जयघोष करत श्री क्षेत्र भगवानगडावर आणून पोहोच केले होते. श्री.कृष्णा महाराज शास्त्री यांना एकनाथवाडीतून निरोप देताना लहान थोरांसह संपूर्ण ग्रामस्थ ढसाधासा रडले होते. श्रो.कृष्णा महाराज शास्त्री हे मूळचे तेलंगणातील असून १७ वर्षांपूर्वी भगवानगडावर आले होते. त्यांचे एमए पर्यंतचे शिक्षण झालेले आहे. यावर्षी दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर त्यांना श्री क्षेत्र भगवानगडाचे चतुर्थ महंत म्हणून गादीवर बसवण्याचा निर्णय विद्यमान मठाधिपती, ह.भ.प. न्यायाचार्य डॉ.श्री नामदेव महाराज शास्त्री बाबा व श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टने घेतला होता. हा सोहळा खूप भव्य दिव्य करण्याचे ठरवले होते. परंतु यावर्षी दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे हा सोहळा खूप भव्य दिव्य करण्याऐवजी छोटेखानी करण्याचा निर्णय श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टने घेतला. कार्यक्रम छोटेखानी असला तरी हा सोहळा पाहण्यासाठी श्री क्षेत्र भगवानगडाचे हजारो भक्त दसऱ्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडावर हजर होते. श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे श्री क्षेत्र भगवानगडाच्या गादीवर चतुर्थ महंत नियुक्त केल्यानंतर सामाजिक जीवनातून पूर्णपणे निवृत्त झाले आहेत. त्यामुळे इथून पुढे श्री क्षेत्र भगवानगडाच्या संपूर्ण भक्त मंडळींनी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती म्हणून ह.भ.प. महंत श्रीगुरु श्री.कृष्णा महाराज शास्त्री बाबा यांच्याशी संपर्कात राहावे. श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान महंत ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांनी स्वतः विधिवत पद्धतीने श्री क्षेत्र भगवानगडाचे चतुर्थ महंत म्हणून ह.भ.प.कृष्णा महाराज शास्त्रीजींना भगवानगडाच्या गादीवर बसवले आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी बाबा यांनी सामाजिक जीवनातून निवृत्ती घेतली असली तरी ते त्यांचे उर्वरित आयुष्य हे ज्ञानेश्वरीचा भावानुवाद लिहिण्यासाठी अर्पण करणार आहेत. ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांनी आयुष्यभर पाण्यावर बसून ज्ञानेश्वरी वाचली आणि महंत शास्त्रीजी त्याच ज्ञानेश्वरीचा संपूर्ण भावानुवाद लिहीत आहेत ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट आहे. इथून पाठीमागे शास्त्रीजींनी ज्याप्रमाणे अनेक प्रकारचे ग्रंथ लिखाण केलेले आहे, इथून पुढेही आयुष्यभर त्यांचे लिखाण व ग्रंथनिर्मिती सुरूच राहणार आहे.

## शेंडीतील शितळा माता मंदिरात आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते महाआरती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त शेंडी येथील श्री शितळा माता मंदिरात राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अक्षयदादा कर्डिले यांच्या हस्ते देवीची महाआरती करण्यात आली. यावेळी जुन्या धार्मिक परंपरांचे नव्या पिढीकडून जतन होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच मंदिराच्या पुढील सुशोभीकरणासाठी आमदार निधीतून भरघोस मदत करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. शितळा देवी मित्र मंडळ आणि सावता ग्रुप, शेंडी यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या उपक्रमांमुळे गावातील जुनी आणि नवी पिढी एकत्र येऊन धार्मिक परंपरा जपत आहेत. यंदाही महाआरतीसाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी शितळा देवी मित्र मंडळाचे सर्व सदस्य, सावता ग्रुप, मोरेश्वर मित्र मंडळ, शेंडी ग्रामस्थ, महिला, भगिनी तसेच लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत अनेकजण सहभागी झाले होते.

## महायुतीच्या विजयासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार!

**आ. सतीशभाऊ चव्हाण यांच्या प्रचाराला पैठण तालुक्यात वेग; शाळा-महाविद्यालयांना शासकीय आफीस ला भेटी देत पहिल्या पसंतीचे मत देण्याचे आवाहन**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. सतीशभाऊ चव्हाण यांच्या विजयासाठी महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार केला आहे. त्यांच्या प्रचारार्थ पैठण शहरासह तालुक्यातील विविध गावांमध्ये जनसंपर्क मोहीम राबविण्यात येत असून, शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन पदवीधर मतदारांनी सतीशभाऊ चव्हाण यांना पहिल्या पसंतीचे मत द्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

या प्रचार मोहिमेंतर्गत पैठण शहरातील विविध महाविद्यालयांसह आडूळ, बालानगर, बिडकीन, धोरकीन, पिंपळवाडी पिराची, लोहगाव, ढाकेफळ, कचनेर, विहामांडवा, नवगाव, आपेगाव, जायकवाडी, कावसान, घारी, दादेगाव, पाटेगाव, चनकवाडी आणि वडवाळी आदी गावांतील शाळा व महाविद्यालयांना भेटी देण्यात आल्या. यावेळी पदवीधर मतदारांशी संपर्क साधून महायुतीचे उमेदवार आ. सतीशभाऊ चव्हाण यांना विजयी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

पैठण तालुक्यातील विविध गावांमध्ये सुरू असलेल्या या प्रचार मोहिमेतून महायुतीच्या कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या प्रचारासाठी कंबर कसल्याचे चित्र दिसत आहे. गावोगावी संपर्क वाढवून पदवीधर मतदारांपर्यंत उमेदवाराची भूमिका पोहोचविण्यावर भर दिला जात आहे. महायुतीच्या विजयासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते एकदिलाने काम करणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या प्रचार मोहिमेत विधानसभा कार्याध्यक्ष विनोद पाटील तांबे, तालुकाध्यक्ष विलास भैय्या शेळके, जिल्हा अध्यक्ष युवक कीशोर पाटील तावरे सेवादलाचे जिल्हाध्यक्ष अनिल हजारे, माजी प्राध्यापक पी. आर. थोटे सर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक जितू परदेशी, , योगेश बप्पा जोशी, भाजपा समन्वयक योगेश चाटुफळे, सुरेश गायकवाड, विलास लिपाने, बद्री पाटील गोरडे, कृष्णा लांडे सर आणि नितीन पोकळे सर यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## विजयादशमीच्या मुहूर्तावर पैठण पोलीस ठाण्यात शस्त्रपूजन

**पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या उपस्थितीत पार पडला धार्मिक विधी**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या मुहूर्तावर पैठण पोलीस ठाण्यात शस्त्रपूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या उपस्थितीत पोलिसांच्या शस्त्रांचे विधिवत पूजन करण्यात आले. विजयादशमीला शस्त्रपूजन करण्याची परंपरा असून, या दिवशी शस्त्रांची पूजा करून कर्तव्याप्रती निष्ठा व्यक्त केली जाते. याच परंपरेनुसार पैठण पोलीस ठाण्यात शस्त्रपूजन करण्यात आले. यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पिंपळगाव तुर्क येथील मुस्लीम कब्रस्तान पाणी टाकी व पाइपलाईन कामाचा शुभारंभ



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रविकास २०२५-२६ अंतर्गत पिंपळगाव तुर्क येथील मुस्लीम कब्रस्तान येथे पाणी टाकी व पाईप लाईनच्या कामाचा शुभारंभ पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, ‘‘गावाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण आणि मूलभूत सुविधांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. पिंपळगाव तुर्कच्या विकासासाठी विविध पदांवर कार्यरत असताना निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. विकासकामे करताना कोणताही भेदभाव न करता सर्व समाजघटकांच्या गरजा लक्षात घेऊन काम करणे, हीच माझी भूमिका सातत्याने राहिली आहे. गावातील नागरिकांच्या सहकार्यामुळे विकासकामांना गती मिळते. यापुढेही पिंपळगाव तुर्कसह संपूर्ण मतदारसंघातील नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आणि आवश्यक विकासनिधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहीन.’’

पिंपळगाव तुर्कच्या विकासासाठी विविध टप्प्यांवर करण्यात आलेली कामे आणि निधीची उपलब्धता ही गावाच्या प्रगतीतील महत्त्वाची बाब ठरली आहे. आगामी काळातही विकासकामांना गती देऊन नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी उस्मान पटेल, हकीम शेख, शफिक शेख, अबूबकर शेख, फैय्याज शेख, रियाज शेख, शकील शेख, मुबारक शेख, सुशील वाळुंज, स्वप्नील वाळुंज यांच्यासह मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

## नालंदा स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून क्रीडा गणवेशाचे डिझाईन

**विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन त्यांच्या कलागुणांना वाव**
**जिल्हास्तरीय स्पर्धेतील खेळाडूंना मोफत क्रीडा गणवेशाचे वाटप**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देत क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने नालंदा स्कूलने अभिनव उपक्रम राबविला .शाळा स्थापनेच्या दहाव्या वर्षात पदार्पण करताना शालेय स्पर्धात्मक क्रीडांसाठी अधिकृत गणवेशाचे रंग आणि डिझाइन निश्चित करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर सोपविण्यात आली. विद्यार्थ्यांनीच तयार केलेल्या संकल्पनेतून विद्यालयाचा क्रीडा गणवेश तयार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून साकार करण्यात आलेला गणवेश जिल्हास्तरीय व त्यापुढील स्तरावरील स्पर्धांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी गणवेश मोफत देण्यात आला.

इयत्ता दहावीतील विद्यार्थी आणि विद्यार्थी परिषदेच्या सहभागातून हा उपक्रम राबविण्यात आला.कु. निदी लुनिया आणि कु.प्राप्ती पटेल यांनी टी-शर्ट व शॉर्ट्स तसेच ट्रॅकसूटचे डिझाईन बनवले. मनाची शांतता, परस्पर विश्वासातून आत्मविश्वास मिळविणे आणि स्थिरतेतून सामर्थ्य निर्माण करत संघर्ष करण्याची व हार न मानण्याची जिद्द या मूल्यांचे दर्शन यामधून घडते.पल्लवी बहादुर्गे,हैदर डिसूजा यांच्या पुढाकारातून तसेच ले.कर्नल यशवंत बहादुर्गे यांच्या सहकार्याने हा उपक्रम साकारण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा व कल्पकतेचा सन्मान करण्याबरोबरच त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा शाळेचा हा प्रयत्न महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे, त्यांच्यात संघभावना निर्माण करणे आणि क्रीडा क्षेत्रातील सहभागाला प्रोत्साहन देणे हा यामागील प्रमुख उद्देश असून.विद्यार्थ्यांच्या अपेक्षा आणि उपलब्ध साधने यांचा समतोल राखत विद्यालयाच्या वतीने दरवर्षी नवनवीन उपक्रम राबविण्यात येतात.विद्यार्थ्यांना नवनवीन संधी उपलब्ध करून देणे त्यांच्या गुणांना वाव देणे ही नालंदा स्कूलची भूमिका आहे. येथील शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नसून, संधी, संस्कार, उज्वल भविष्य असल्याचे सांगत क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह जिल्हास्तरीय किंवा त्यापुढील स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेच्या अधिकृत क्रीडा रंगांचा गणवेश भेट देण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### आध्यात्मिक वक्त्या जया किशोरीजी यांची आमदार जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



अहिल्यानगर - विश्वविख्यात आध्यात्मिक वक्त्या जया किशोरीजी यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी पार्वतीबाई जगताप यांच्या हस्ते जया किशोरीजी यांचा सत्कार करण्यात आला. या भेटीदरम्यान धार्मिक आणि आध्यात्मिक विषयांवर चर्चा झाली. या प्रसंगी माजी नगरसेविका शीतलताई संग्राम जगताप, परमेश्वरी जगताप, संघशिला जगताप, आराध्य जगताप, आदेश्री जगताप यांच्यासह भाविक उपस्थित होते. जया किशोरीजी यांच्या भेटीमुळे उपस्थितांना आध्यात्मिक विषयांवर संवाद साधण्याची संधी मिळाली.

### धार्मिकतेतून संस्कृतीचे जतन होते - माजी उपमहापौर गीतांजली काळे



अहिल्यानगर : महिलांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर सर्वच क्षेत्रांत आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे. कुटुंबाची जबाबदारी सांभाळतानाच त्या आपले कर्तव्य सक्षमपणे पार पाडत आहेत. देशाच्या जडणघडणीत महिलांचे योगदान मोठे आहे. शारदीय नवरात्रोत्सव हा देवीमातेच्या आराधनेचा आणि महिला शक्तीचा गौरव करण्याचा उत्सव आहे. या काळात महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करून त्यांच्या कार्याची समाजाला ओळख करून देणे गरजेचे आहे. धार्मिकतेतून संस्कृतीचे जतन होत असून, महिलाच कुटुंबात सुसंस्कृत पिढी घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात, असे प्रतिपादन अहिल्यानगरच्या माजी उपमहापौर गीतांजली काळे यांनी केले.शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त आगरकर मळा येथील स्वराज्य महिला मंडळाच्या वतीने शहरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नऊ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी गीतांजली काळे म्हणाल्या की, ज्या ठिकाणी महिलेचा सन्मान होतो, त्या ठिकाणी देवाचा सहवास लाभतो, अशी आपली श्रद्धा आहे. महिलांच्या कार्याचा गौरव केल्याने महिला शक्तीचे महत्त्व समाजासमोर येते. नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरा जपत संस्कृतीचे संवर्धन करण्याचे कामही होत असते. असे त्या म्हणाल्या.
या कार्यक्रमाला मीनाली चव्हाण, सुनीता शिदोरे, कल्पना बळघट, मितल गांधी, प्राची काळे, पूजा चैहाण, रेणुका औसरकर मेघा झावरे, जयश्री गुरव, मनीषा लहाडे, जया गुरव, पूजा बनभेरू, शुभांगी गांधी, शिवानी हापसे, राकेश सायखेडेकर यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.धार्मिकतेतून संस्कृतीचे जतन होते. स्वराज्य महिला मंडळाच्या वतीने प्रभाताई भोक, डॉ. दया देठे, डॉ. स्नेहा निकरड, मोनाली मुंडे, डॉ. वैदवी गायकवाड, सोनाली साबळे, पायल नवसुपे, शोभा भालसिंग आणि योगिता अडकित्ते या नऊ कर्तृत्ववान महिलांचा तुळशीचे रोप देऊन सन्मान करण्यात आला. महिलांनी आपापल्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांचा गौरव करण्यात आला.

### भिंगारचे सदाशिव भंडारी यांचे निधन

अहिल्यानगर- भिंगार येथील नामांकित पैलवान सदाशिव तुकाराम भंडारी यांचे नुकतेच निधन झाले. ते ९८ वर्षाचे होते. जुन्या काळातील प्रसिध्द मल्ल असल्याने ते सर्वांना सुपरिचित होते. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, मुली, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. ते कै. प्रभाकर भंडारी, राजेंद्र भंडारी, ईश्वर भंडारी व संजय भंडारी यांचे वडिल होते. त्यांचा अंत्यविधी भिंगार येथील अमरधाम येथे झाला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



# शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त तुळजाभवानी माता मंदिरात नवचंडी महायज्ञ व कुमारिका पूजन

**देवीच्या शक्तिरूपाची उपासना; बालिकांमध्ये देवीचे रूप पाहून सन्मान**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पाइपलाइन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात नवचंडी महायज्ञ व कुमारिका पूजन धार्मिक उत्साहात संपन्न झाले. नवचंडी महायज्ञातून देवीच्या शक्तिरूपाची उपासना करण्यात आली, तर कुमारिका पूजनाच्या माध्यमातून बालिकांमध्ये देवीचे रूप पाहून त्यांचा सन्मान करण्यात आला. या धार्मिक विधींमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

शारदीय नवरात्रोत्सव हा देवीच्या उपासनेचा आणि शक्तीच्या आराधनेचा महत्त्वपूर्ण उत्सव मानला जातो. हिंदू धर्मात या उत्सवाला विशेष महत्त्व असून, नवरात्रात देवीच्या विविध रूपांची पूजा-अर्चा केली जाते. याच धार्मिक परंपरेनुसार श्री तुळजाभवानी माता मंदिरात नवचंडी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले. या यज्ञाच्या माध्यमातून देवीच्या शक्तिरूपाची आराधना करण्यात आली. तसेच कुमारिका पूजन करून बालिकांमधील देवीच्या स्वरूपाचा सन्मान करण्यात आला.

या दोन्ही धार्मिक विधींच्या माध्यमातून श्रद्धा, भक्ती आणि स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याचा संदेश देण्यात आला. देवीच्या चरणी सुख-समृद्धी, शांती आणि कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली. या कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला.

या प्रसंगी धनश्री सुजय विखे पाटील, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, देवस्थानचे संस्थापक अशोक कानडे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, माजी सभापती पुष्पाताई बोरुडे, पुष्कर कुलकर्णी, डॉ. सागर बोरुडे, अशोक गायकवाड, बाळासाहेब पवार, ओमप्रकाश तिवारी, नगरसेविका शारदाताई ढवण यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापालिका आरोग्य विभाग व प्रभाग समिती क्रमांक ३ च्या वतीने एकात्मिक आरोग्य समितीची बैठक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग व प्रभाग समिती कार्यालय क्रमांक ३ यांच्या वतीने एकात्मिक आरोग्य समितीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेण्यात आला. तसेच गरोदर मातांच्या आरोग्याची काळजी, महिलांची हिमोग्लोबिन तपासणी, रक्तक्षय प्रतिबंध आणि आरोग्यविषयक योजनांबाबत जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आरोग्य सुविधा थेट गरजू नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागाने प्रभावीपणे काम करावे, असे निर्देश आरोग्य समितीचे अध्यक्ष डॉ. सागर बोरुडे यांनी दिले.

या बैठकीला महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, . आशा व आरोग्य सेविका उपस्थित होत्या. बैठकीदरम्यान आरोग्य केंद्रांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा, नागरिकांपर्यंत आरोग्यविषयक माहिती पोहोचविणे आणि विविध आजारांबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे या विषयांवर चर्चा करण्यात आली.

डॉ. सागर बोरुडे म्हणाले की, महापालिकेची आरोग्य केंद्रे ही नागरिकांसाठी आरोग्य मंदिरे आहेत. या केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. मात्र, मुकुंदनगर आरोग्य केंद्राच्या परिसरात नुकसान केले जाते, कचरा टाकला जातो तसेच वाहनांचे पार्किंग केले जाते. त्यामुळे आरोग्य सेवा पुरविताना अडचणी निर्माण होतात. या प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने संबंधित ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी सूचना त्यांनी केली.

शहरातील महिलांपर्यंत पोहोचून त्यांच्या हिमोग्लोबिनची तपासणी करणे आवश्यक आहे.

## नवीन डीपी रस्त्यामुळे शास्त्रीनगरच्या

# नागरिकांचा दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागणार - आमदार संग्राम जगताप

**शास्त्रीनगर डीपी रस्त्याच्या कामाचा आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते शुभारंभ । १८ मीटरच्या नवीन रस्त्यामुळे नागरिकांना दिलासा**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १७ मध्ये स्थायी समितीचे माजी सभापती तथा नगरसेवक मनोज कोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून शास्त्रीनगरला जोडणाऱ्या १८ मीटर रुंदीच्या नवीन डीपी रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. या नवीन रस्त्यामुळे शास्त्रीनगर परिसरातील नागरिकांचा दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागण्यास मदत होणार असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.



शास्त्रीनगर परिसरातील नागरिकांना केडगाव देवी रस्त्याचा वापर करून ये-जा करावी लागते. मात्र, शारदीय नवरात्रोत्सवादरम्यान केडगाव देवी मंदिरात दर्शनासाठी जिल्हाभरातून मोठ्या संख्येने भाविक येत असल्याने त्यांच्या सोयीसाठी या रस्त्यावर बॅरिकेड्स लावण्यात येतात. त्यामुळे शास्त्रीनगर परिसरातील नागरिकांना दैनंदिन ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येवर कायमस्वरूपी पर्याय म्हणून शास्त्रीनगरकडे जाणारा १८ मीटर रुंदीचा डीपी रस्ता विकसित करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. या रस्त्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनीही परवानगी दिल्याने कामाचा मार्ग मोकळा झाला असून, आता डांबरीकरणाचे काम सुरू झाले आहे.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, नवीन डीपी रस्त्यांची निर्मिती झाल्यामुळे शहरातील विविध भागांमधील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे. शास्त्रीनगर परिसरातील नागरिकांना नवरात्रोत्सवाच्या काळात निर्माण होणाऱ्या वाहतुकीच्या अडचणींमधून दिलासा मिळेल. या रस्त्यामुळे नागरिकांना पर्यायी मार्ग उपलब्ध होऊन त्यांचा दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

स्थायी समितीचे माजी सभापती तथा नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले की, केडगाव देवी मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान असून, शारदीय नवरात्रोत्सवात जिल्हाभरातून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. भाविकांच्या सोयीसाठी केडगाव देवी रस्त्यावर बॅरिकेड्स लावले जात असल्याने शास्त्रीनगरमधील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न निर्माण होत होता. ही अडचण दूर करण्यासाठी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे आणि उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

महापालिकेच्या माध्यमातून शास्त्रीनगरला जोडणाऱ्या नवीन १८ मीटर डीपी रस्त्यासाठी निधी मंजूर करून घेण्यात आला असून, प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांचा दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागण्यास मदत होणार आहे. भविष्यात हा डीपी रस्ता शास्त्रीनगर भुयारी रेल्वे मार्गालाही जोडला जाणार आहे. प्रभाग क्रमांक १७ मध्ये सातत्याने विकासकामे सुरू असून, या कामांमुळे प्रभागाचा कायापालट होत आहे. विकासकामांसाठी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे हा प्रभाग अहिल्यानगर शहरातील विकसित प्रभाग म्हणून ओळखला जाईल, असा विश्वासही मनोज कोतकर यांनी व्यक्त केला.

या शुभारंभप्रसंगी संभाजी पवार, नगरसेवक मयूर बांगरे, जालिंदर कोतकर, सुमित लोंढे, नगरसेवक सुजय मोहिते, दत्ता गाडळकर, महेश लोंढे, करण कराळे, मनोज कराळे, अजित कोतकर, नवनाथ कोतकर, सोन्या बापू घेबूड, बाळासाहेब कोतकर, विजय सुंबे, महेश दळवी, महेश कोतकर, सूरज गाडे, सूरज कोतकर, किशोर कोतकर, शाम कोतकर यांच्यासह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीएनजी ज्वेलर्स तर्फे सप्तम कलेक्शनसह दिवाळीचा उत्सव; सर्व स्टोअर्समध्ये आकर्षक फेस्टिव्ह ऑफर्स

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारतातील सर्वात विश्वासार्ह आणि प्रतिष्ठित दागिन्यांच्या ब्रँड्सपैकी एक असलेल्या पीएनजी ज्वेलर्सने दिवाळीनिमित्त विशेष मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेचे मुख्य आकर्षण म्हणजे 'सप्तम कलेक्शन'. या निमित्ताने ग्राहकांना सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ५० टक्क्यांपर्यंत, तर हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जे सवर १०० टक्क्यांपर्यंत सूट मिळणार आहे. जुन्या सोन्याच्या बदल्यात नवीन दागिने घेताना कोणतीही कपात केली जाणार नाही. (हे सर्व लाभ नियम व अटींच्या अधीन आहेत).या मोहिमेअंतर्गत पीएनजी ज्वेलर्स तर्फे 'प्युअर प्राइस' सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेनुसार, दागिन्यांची बुकिंग करताना बुकिंगच्या दिवशी किंवा बिलिंगच्या दिवशी लागू असलेल्या सोन्याच्या दरांपैकी जो दर कमी असेल, त्या दराचा लाभ ग्राहकांना मिळेल. त्यामुळे सोन्याच्या दरातील चढ-उतार लक्षात घेऊन ग्राहकांना खरेदीचे नियोजन करता येईल. या ऑफर्स पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व स्टोअर्समध्ये १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत उपलब्ध असतील.



या मोहिमेचे प्रमुख आकर्षण असलेले 'सप्तम कलेक्शन' हे दिवाळीच्या उत्सवाशी निगडित सात भावनांपासून प्रेरित आहे. या कलेक्शनमध्ये पारंपरिक अँटिक गोल्ड आणि हिऱ्यांच्या दागिन्यांचा समावेश आहे. नेकलेस, इअरिंग्स , अंगठ्या आणि ब्रेसलेट्स अशा विविध प्रकारांतील दागिने यामध्ये उपलब्ध आहेत. या कलेक्शनमध्ये पारंपरिक कलाकुसर आणि आधुनिक शैलीचा मिलाफ साधणाऱ्या, तसेच दैनंदिन वापरासाठीही सहज परिधान करता येतील अशा आकर्षक डिझाइन्स सादर करण्यात आल्या आहेत.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, "दिवाळी हा भारतात सोन्याच्या खरेदीसाठी सर्वात महत्त्वाच्या सणांपैकी एक आहे.या खरेदीला सांस्कृतिक महत्त्व आहेच, शिवाय गुंतवणुकीच्या दृष्टिकोनातूनही पहिले जाते. अलीकडे सोन्याच्या दरात झालेल्या घसरणीनंतर ग्राहकांमध्ये खरेदीबाबत उत्साह दिसून येत आहे. विशेषतः सणासुदीच्या आणि आगामी लग्नसराईच्या खरेदीला ग्राहक प्राधान्य देत आहेत.
सप्तम कलेक्शनच्या माध्यमातून आम्ही दिवाळीशी निगडित भावनांना आकर्षक दागिन्यांच्या डिझाइन्समधून साकारले आहे. मेकिंग चार्जेसवरील विशेष सवलती आणि जुन्या सोन्याच्या बदल्यात नवीन दागिने घेताना कोणतीही कपात न करण्याच्या सुविधेमुळे ग्राहकांना आपल्या बजेटनुसार जुन्या दागिन्यांच्या जागी नवीन डिझाइन्स निवडता येतील. नवनवीन डिझाइन्स आणि पिढ्यान्पिढ्या आमच्याशी जोडलेल्या कुटुंबांचा विश्वास यांच्या बळावर आम्ही आगामी सणासुदीच्या हंगामासाठी सज्ज आहोत." भारतात दिवाळी हा सोने आणि दागिन्यांच्या खरेदीसाठी शुभ मुहूर्त मानला जातो. या मोहिमेद्वारे पीएनजी ज्वेलर्सने शुद्धता, विश्वास आणि उत्कृष्ट कारागिरी यांप्रती असलेली आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली आहे. या दिवाळीत ग्राहकांना सप्तम आणि ईना कलेक्शन मधील विविध डिझाइन्स अनुभवता येणार आहेत. पारंपरिक कलाकुसर आणि आधुनिक शैली यांचा सुंदर मिलाफ या दागिन्यांमध्ये पाहायला मिळतो.
दिवाळीनंतर लगेच सुरू होणाऱ्या लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर, आगामी महिन्यांतील खरेदीचे नियोजन करण्याची संधीही या मोहिमेमुळे ग्राहकांना मिळणार आहे. १९४ वर्षांची परंपरा, विश्वास, शुद्धता आणि उत्कृष्ट कारागिरी यांचा वारसा जपत पीएनजी ज्वेलर्स विविध खास प्रसंगांसाठी दागिन्यांची विस्तृत श्रेणी उपलब्ध करून देत आहे.

# नय्यर माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत यश

**विद्यालयाच्या ३ संघ व १३ खेळाडूंची विभागीय पातळीवर निवड**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या विविध जिल्हास्तरीय स्पर्धेत नय्यर विद्यालयातील खेळाडूंनी विशेष प्राविण्य प्राप्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे स्वागत बायजाबाई शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष व माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, गणेश केकाण, संचालक भास्करराव गोरे, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एकनाथ मोटे यांनी केले, तर संस्थेचे अध्यक्ष काकाशेठ नय्यर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत खो-खो १४ वर्षे मुली, १७ वर्ष मुली (द्वितीय क्रमांक), १७ वर्षे मुले (तृतीय क्रमांक), बेसबॉल स्पर्धेत १९ वर्ष मुले व मुली (प्रथम क्रमांक), १७ वर्षे मुले व मुली (तृतीय क्रमांक), १४ वर्षे मुली (प्रथम क्रमांक), व्हॉलीबॉल स्पर्धेत १४ वर्षे मुली व १७ वर्षे मुली (द्वितीय क्रमांक).

सॉफ्टबॉल स्पर्धेत १९ वर्षे मुली (द्वितीय क्रमांक), १४ वर्षे मुले व १७ वर्षे मुली (तृतीय क्रमांक), थ्रो बॉल स्पर्धेत १४ वर्षे मुले, १७ वर्षे मुले, १९ वर्षे मुले, १९ वर्षे मुली संघ (तृतीय क्रमांक), आट्यापाट्या स्पर्धेत १७ वर्षे मुले (प्रथम क्रमांक), १७ वर्ष मुली, १९ वर्षे मुले व मुली (द्वितीय क्रमांक) पटकावला, तर वैयक्तिक स्पर्धेत अनय महामुनी बुद्धिबळ स्पर्धेत (तृतीय क्रमांक), वेटलिफ्टिंग स्पर्धेत साहिल कसोटे व साई पोपळे (प्रथम क्रमांक), तायक्वांदो स्पर्धेत ईश्वरी ढाकणे व पायल खामकर (द्वितीय क्रमांक), तलवारबाजी - ओम नागरगोजे (तृतीय क्रमांक), गोळाफेक- श्रावणी कावळे (प्रथम क्रमांक), २०० मीटर धावणे - भक्ती पालवे (प्रथम क्रमांक), १०० मीटर धावणे - स्वरा क्षीरसागर (द्वितीय क्रमांक), ६०० मीटर धावणे- साईराज कोल्हे (तृतीय क्रमांक), लांब उडी (द्वितीय क्रमांक), २०० मीटर व ४०० मीटर धावणे- प्रिया गव्हाणे (तृतीय क्रमांक), ४०० मीटर धावणे- गौरव म्हस्के (तृतीय क्रमांक), थाळीफेक- आरती जगताप (तृतीय क्रमांक), ८०० मीटर धावणे- अंजली विश्वकर्मा (तृतीय क्रमांक), २०० मीटर धावणे- तेजश्री मिसाळ (तृतीय क्रमांक), हातोडा फेक- स्वराज भताने (तृतीय क्रमांक), हातोडा फेक- साई पोपळे (द्वितीय क्रमांक), हातोडा फेक- नियती घोडके (प्रथम क्रमांक), हातोडाफेक- वारे सिद्धी (द्वितीय क्रमांक), हातोडा फेक- शिरसाठ सिद्धी (द्वितीय क्रमांक), हातोडा फेक- आरती गीते (तृतीय क्रमांक), लांब उडी- माधुरी माधुरी (तृतीय क्रमांक), लांबउडी जगताप आरती (तृतीय क्रमांक).

स्कॅवेश स्पर्धेत साईराज कोल्हे, गीते आरती, वारे सिद्धी, ओम नागरगोजे, पालवे रोहित, कसोटी साहिल, माधुरी झिपुर्डे यांची विभागीय स्पर्धेत निवड झाली, तसेच नियती घोडके, साहिल कसोटे, साई पोकळे, श्रावणी कावळे, पालवे भक्ती, स्वरा क्षीरसागर यांची विभागीय पातळीवर खेळण्यासाठी निवड झाली आहे, तर खो-खो स्पर्धा १४ वर्षे मुली व १७ वर्षे मुली व आट्यापाट्या १७ वर्षे मुले यांची विभागीय पातळीवर खेळण्यासाठी निवड झाली आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, क्रीडा शिक्षक संतोष नागरगोजे व क्रीडा मार्गदर्शक अजय जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

# नगरचे सुपुत्र मनोज छाजेड यांची 'जितो पुणे चॅप्टर'च्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड

## अहिल्यानगरकरांकडून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो)च्या प्रतिष्ठित पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी आपल्या अहिल्यानगरचे सुपुत्र तथा प्रसिद्ध उद्योजक मनोज छाजेड यांची बिनविरोध निवड झाली आहे. मूळच्या अहिल्यानगरच्या भूमिपुत्राने पुण्यासारख्या मोठ्या शहरातील एका प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय संघटनेच्या नेतृत्वाची धुरा स्वीकारणे ही समस्त अहिल्यानगरकरांसाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब ठरली आहे.

जितो पुणेच्या सर्वसाधारण सभेत सन २०२६२८ या कार्यकाळासाठी नव्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मुख्य सचिवपदी जिनेंद्र लोढा यांची सर्वानुमते निवड झाली. जितो पुणे महिला शाखेच्या अध्यक्षपदी लतिका सांखला, तर मुख्य सचिवपदी वंदना राठोड यांची निवड करण्यात आली. युवा शाखेच्या अध्यक्षपदी ऋषभ दुगड आणि मुख्य सचिवपदी स्वराज पगारिया यांची निवड झाली. या सभेला जितो अपेक्सचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय भंडारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

उद्योजक मनोज छाजेड हे मूळचे अहिल्यानगरचे असून व्यवसायानिमित्त पुण्यात स्थायिक झाले आहेत. पुण्यात उद्योग–व्यवसायाचा विस्तार करत असतानाही त्यांनी आपल्या जन्मभूमीशी असलेली नाळ कायम जपली आहे. संपूर्ण छाजेड परिवार धार्मिक व सामाजिक कार्याशी जोडलेला असून आचार्यश्री आनंदऋषीजी महाराज यांच्यावर त्यांची नितांत श्रद्धा आहे. पुणे तसेच अहिल्यानगर येथील विविध सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी उपक्रमांमध्ये मनोज छाजेड नेहमीच अग्रेसर असतात.

सामाजिक बांधिलकी जपत गेल्या १९ वर्षांपासून आयोजित रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून सुमारे २५ हजार रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले आहे. मुळशी परिसरात वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनासाठी योगदान तसेच कोरोना काळात जितोच्या कोविड सेंटर उभारणीसाठी केलेले सहकार्य अशा विविध उपक्रमांतून मनोज छाजेड यांनी समाजसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना नुकताच प्रतिष्ठेचा 'सूर्यदत्ता बन्सीरत्न मानव सेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे.

मनोज छाजेड यांच्या उद्योग व बांधकाम क्षेत्रातील कामगिरीचा तसेच सामाजिक योगदानाचा विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे. 'ड्रीम बिल्डर्स ऑफ इंडिया'चा 'विश्वकर्मा पुरस्कार' त्यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री शरदचंद्र पवार आणि सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्तेही त्यांचा 'उत्कृष्ट उद्योजक' म्हणून सन्मान करण्यात आला आहे.

रक्तदान चळवळीतील सातत्यपूर्ण योगदानाबद्दल आदिनाथ श्री संघातर्फे त्यांना 'रक्तदान प्रणेता' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आचार्यश्री शिवमुनीजी यांच्या हस्ते त्यांना 'रक्तदान महर्षी' पुरस्कार प्रदान करण्यात आला असून ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेतर्फेही त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे.

बांधकाम क्षेत्रातील नावीन्यपूर्ण संकल्पना आणि रचनात्मक कामगिरीबद्दल आधार फाउंडेशनतर्फे सन २०२३ मध्ये त्यांना उत्कृष्ट नावीन्यपूर्ण डिझाइन व बांधकामासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. तसेच 'बॉलीवूड मराठी चित्रपट व टीव्ही सीरियल'तर्फे त्यांना 'लढवय्या पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. या सन्मानांतून त्यांच्या उद्योगशीलतेसोबतच सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावी कार्याची दखल घेण्यात आली आहे.

अहिल्यानगरमधील बुरूडगाव रोड परिसरात छाजेड परिवाराने अत्यंत प्रशस्त, आधुनिक आणि आलिशान सुविधांनी युक्त असा 'स्कायब्रिज' निवासी गृहप्रकल्प साकारला आहे.

# अहिल्यानगरमध्ये 'माहेश्वरी समाजाचे कुलदेवी दर्शन व रास-दांडिया' उत्साहात संपन्न

## महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांसह राजस्थानातील ३८ हून अधिक कुलदेवींचे दर्शन; धार्मिक विधी व रास-दांडियाला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** माहेश्वरी समाजाची धार्मिक आस्था, सामाजिक एकता आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याच्या उद्देशाने श्री माहेश्वरी युवक मंडळ, अहिल्यानगर आणि माहेश्वरी कनेक्ट, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'माहेश्वरी कुलदेवी दर्शन आणि रास-दांडिया' हा भव्य धार्मिक व सांस्कृतिक सोहळा नंदनवन लॉन्स येथे उत्साहात संपन्न झाला.

या सोहळ्यात महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांतील देवींच्या तसेच राजस्थानातील ३८ हून अधिक माहेश्वरी समाजाच्या कुलदेवींच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. सकाळपासून कुलदेवी दर्शनासाठी समाजबांधवांनी उपस्थिती लावली. विधिवत पूजा-अर्चा, होम-हवन आणि आरती अशा धार्मिक विधींमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

सायंकाळी आयोजित रास-दांडिया कार्यक्रमात समाजबांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पारंपरिक वेशभूषा, संगीत आणि दांडियाच्या तालावर रंगलेल्या या सोहळ्यामुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले. धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक परंपरांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला.

माहेश्वरी समाजाच्या विविध कुलदेवींचे एकाच ठिकाणी दर्शन घडवून आणणे, समाजातील बंधुभाव वृद्धिंगत करणे आणि नव्या पिढीला



आपल्या धार्मिक व सांस्कृतिक वारशाची ओळख करून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या कार्यक्रमामुळे समाजातील एकात्मता, परस्पर सहकार्य आणि सांस्कृतिक जिव्हाळा अधिक दृढ झाला.

या कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक मोहनलाल व पराग मानधाना होते. भोजन व प्रसादी प्रायोजक म्हणून श्रीगोपाल रामनाथ धुत-इपिटोम कॉम्पोनंट यांनी सहकार्य केले. सहप्रायोजक म्हणून सीताराम सुखदेव बिहाणी व बंगडीवाला परिवार तसेच संजय पुगालिया, पुगालिया वुलन मिल प्रा. लि. यांचे सहकार्य लाभले. पारितोषिक प्रायोजक म्हणून गणेश टेक्सटाईल यांनी योगदान दिले.

याशिवाय श्रीगोपाल चांडक, गोकुळ लाहोटी, सुनील बूब, परेश बजाज, सागरबिहाणी, श्रीगोपाल जाखोटिया, योगेश जाजू, महेश इंदाणी, कमलेश झंवर, श्रीनिवास झंवर, बजरंग दरक, राजेश बजाज, महेंद्र जाखेटे,पवन धुत, रितेश मालाणी, मधुसुदन सारडा, गोवर्धन बिहाणी, नितीन बजाज, राघवेंद्र बिहाणी, दर्शन सोनी, किसनालाल बंग आणि मुकेश पल्लोड यांचे सहकार्य लाभले. अहिल्यानगर तालुका माहेश्वरी सभेचे विशेष सहकार्य या कार्यक्रमाला मिळाले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी माहेश्वरी कनेक्ट टीममधील मनीष सोमाणी, योगेश बजाज, निलेश बिहाणी, भूषण मालू, रविकांत काबरा, धीरज डागा आणि महेश हेडा यांच्यासह श्री माहेश्वरी युवक मंडळाचे अध्यक्ष अमित खटोड, सचिव पियुष झंवर, उपाध्यक्ष पवन बंग, खजिनदार सीए मनीष नावंदर, सचिव प्रतीक सारडा, ॲड. शाम भुतडा, विशाल झंवर, सुमित चांडक, गोविंदा जाखोटिया, संकेत मानधणे, सीए अनिकेत बलदवा, गोविंद दरक, सुमित बिहाणी, सिद्धार्थ झंवर, संकेत अट्टल, मधुर बिहाणी, इंजि. गोविंदा काकाणी, भूषण काबरा, आदित्य काकाणी, इंटे. अभिनंदन कालाणी, वेदांत बजाज, सीए प्रणव बिहाणी, ऋषिकेश बजाज आणि यश खटोड यांनी परिश्रम घेतले.

# एमआयडीसीच्या रेणुकामाता देवस्थानात २५ फुटी रावणाचे दहन; आतषबाजीने आसमंत उजळला!

## । 'बोलो सियारामचंद्र की जय'च्या जयघोषात रेणुकामाता देवस्थानात रावण दहन सोहळा
## । ढोल–ताशांचा निनाद, घोड्यांचा ठेका अन् नेत्रदीपक आतषबाजी







**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विजयादशमी निमित्त एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुकामाता देवस्थान ट्रस्टच्या वतीने २५ फुटी रावणाच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. रावण दहनाचा थरार अनुभवण्यासाठी पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी देवस्थानच्या मैदानात मोठी गर्दी केली होती. रावण दहनानंतर करण्यात आलेल्या नेत्रदीपक आतषबाजीने संपूर्ण परिसर उजळून निघाला. 'बोलो सियारामचंद्र की जय'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला आणि उत्साहपूर्ण वातावरणात विजयादशमीचा सोहळा साजरा करण्यात आला.

विजयादशमीनिमित्त देवस्थान परिसरात धार्मिक आणि सांस्कृतिक उत्साहाचे वातावरण होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मंदिरात श्री रेणुकामातेची विधिवत आरती करण्यात आली. त्यानंतर वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. हलगी आणि संबळच्या निनादाने परिसरात उत्साह संचारला होता. पारंपरिक वाद्यांच्या तालावर देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी आणि भाविकांनी ठेका धरत मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या मिरवणुकीतील तालावर नृत्य करणाऱ्या घोड्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. तसेच पांडा आणि चिपांझीच्या कार्टून पात्रांनी बालगोपालांचे मनोरंजन केले. लहान मुलांसह नागरिकांनीही या मिरवणुकीचा आनंद घेतला. मंदिर परिसरातून सुरू झालेल्या या मिरवणुकीमुळे विजयादशमीच्या उत्सवाला अधिकच रंगत आली. मिरवणुकीनंतर मंदिरासमोरील मैदानात उभारण्यात आलेल्या २५ फुटी रावणाच्या प्रतिकृतीचे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या हस्ते दहन करण्यात आले. यावेळी श्री रेणुकामाता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारो भाविक उपस्थित होते.

रावण दहन होताच उपस्थित भाविकांनी 'बोलो सियारामचंद्र की जय'चा एकच जयघोष केला. या घोषणांनी संपूर्ण मैदान दुमदुमून गेले. रावण दहनानंतर सुरू झालेल्या भव्य आतषबाजीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. रंगीबेरंगी फटाक्यांच्या रोषणाईने आकाश उजळून निघाले. हजारो भाविकांनी या नेत्रदीपक सोहळ्याचा मनमुराद आनंद लुटला. शिस्तबद्ध नियोजन आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

देवस्थान ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सव काळात विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विजयादशमीच्या दिवशी पार पडलेल्या रावण दहन सोहळ्यामुळे उत्सवाची सांगता उत्साहात झाली.

# संत निरंकारी मिशनचा ७९वा वार्षिक संत समागम शुक्रवार पासून

## अहिल्यानगर शहर व जिल्हयातून हजारो अनुयायी रवाना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या छत्रछायेखाली निरंकारी मिशनच्या वतीने चार दिवसीय ७९वा वार्षिक संत समागमाचे भव्य आयोजन निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा, हरियाणा येथे शुक्रवार (दि.२३) ते सोमवार (दि.२६ ऑक्टो.) पर्यंत होणार असून संत समागमात नगर शहर व नगर जिल्ह्यातून तसेच अहिल्यानगर क्षेत्र(३६अ) अंतर्गत येणाऱ्या शाखा बीड, परभणी, हिंगोली, नांदेड आदि ठिकाणाहून हजारो भक्तगण उद्या रवाना होणार असल्याची माहिती मिशनचे अहिल्यानगर झोन प्रमुख हरीश खुबचंदानी यांनी दिली.

या समागमात प्रत्येक पाऊल मानव कल्याणाच्या दिशेने अग्रेसर होईल, प्रत्येक भाव समर्पणात परिवर्तीत होईल आणि प्रत्येक हृदय प्रेमाच्या त्या दिव्यज्योतीने प्रकाशित होईल जी मानवतेला एकत्व, सदभावना आणि प्रभूभक्तिच्या सूत्रात बांधण्याचा संदेश देते, जिथे ब्रह्मज्ञानाने चेतना जागृत होते, जिथे सेवा हाच जीवनाचा संकल्प बनतो तिथेच संत समागम आत्मिक जागृतीचा असा पवित्र उत्सव बनतो, जो माणसाला स्वतःच्या आत डोकावून पाहण्याची आणि परमात्म्याशी जोडले जाण्याची प्रेरणा देतो, याचाच दिव्य अनुभव घेण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो अनुयायी तसेच विदेशातील हजारो श्रद्धाळू या पावन प्रसंगी एकत्र येऊन सत्संग, सेवा, प्रेम आणि भक्तीचा अनुभव घेण्यासाठी या दिव्य आध्यात्मिक संमेलनात सहभागी होणार आहेत.या संत समागमात शोभायात्रा, सेवादल रॅली,सत्संग, भक्तीगीते, बहुभाषिक कवीदरबार तसेच राजपिता व सदगुरू माताजींचे दररोज सत्राच्या शेवटी प्रवचन होतील.

शेकडो एकरच्या निरंकारी आध्यात्मिक स्थळ येथे उभारण्यात आलेले भव्य, आकर्षक असे मुख्य प्रवेशद्वार विशेष आकर्षणाचे केंद्र बनले आहे, तसेच सुरळीत संचालन, सहज ये-जा आणि श्रद्धाळूंना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने संपूर्ण परिसर चार प्रमुख भागांमध्ये विभागण्यात आला आहे.सेवादल सदस्यांनी व अनुयायींनी कठोर व निःस्वार्थ भावनेने केलेल्या सेवाकार्यामुळे या स्थळाला एका सुंदर, भव्य आध्यात्मिक नगरीचे स्वरूप प्राप्त झाले आहे तसेच निरंकारी प्रदर्शनी, प्रकाशन स्टॉल, लंगर, कॅन्टीन, प्याउ, पार्किंग आदि सुविधा उपलब्ध करण्यात आल्या असून सर्व व्यवस्था निरंकारी सेवादल सदस्य तन्मयतेने पार पाडतात.

या पवित्र संत समागमात सर्व सज्जनांचे आणि श्रद्धाळू,भक्तांचे मनःपूर्वक स्वागत आहे, चला या आत्मिक मिलन आणि भक्तीच्या महासंगमाचा भाग बनू या, सदगुरूंचे दिव्य दर्शन व अमृतमय प्रवचनांचा लाभ घेऊया आणि आत्म्याला परमात्म्याशी जोडणाऱ्या या अद्वितीय प्रवासात सहभागी होऊन जीवनाला धन्य करूया, अशी विनंती मिशनच्या वतीने करण्यात आली आहे.

# हिंदुत्वाच्या कार्यासाठी अविष्कार भाऊ भुसे यांची ठाम साथ!

## संतोष ब्राम्हणे यांच्या सदिच्छा भेटीत हिंदुत्वावर चर्चा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव–** हिंदुत्वाची विचारधारा, या विचारांसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची भूमिका आणि हिंदुत्वाच्या कार्याला अधिक बळ देण्याच्या अनुषंगाने संतोष ब्राम्हणे यांनी महाराष्ट्राचे शालेय शिक्षण मंत्री माननीय दादाजी भुसे यांचे चिरंजीव तथा युवा सेना प्रमुख (शिंदे गट) माननीय अविष्कार भाऊ भुसे यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान हिंदुत्वाच्या विविध विषयांवर चर्चा झाली. तसेच हिंदुत्वाच्या कार्यासाठी प्रखरपणे तुमच्या पाठीशी उभा राहील, असे आश्वासन अविष्कार भाऊ भुसे यांनी संतोष ब्राम्हणे यांना यावेळी दिले.



हिंदुत्वासाठी कार्य करताना विचारांशी प्रामाणिक राहणे, समाजात हिंदुत्वाची विचारधारा प्रभावीपणे पोहोचवणे आणि या कार्यात सहभागी असलेल्या कार्यकर्त्यांना बळ देणे, या अनुषंगाने या भेटीत विचारांची देवाणघेवाण झाली. हिंदुत्वाच्या विचारांसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची भूमिका अविष्कार भाऊ भुसे यांनी यावेळी स्पष्ट केली.

संतोष ब्राम्हणे आणि अविष्कार भाऊ भुसे यांच्यात झालेल्या या सदिच्छा भेटीमुळे हिंदुत्वाच्या कार्यासंदर्भात सकारात्मक चर्चा घडून आली. हिंदुत्वाच्या विचारधारेसाठी निष्ठेने आणि प्रखरपणे कार्य करत राहण्याचा निर्धार या भेटीतून व्यक्त झाला. आगामी काळात हिंदुत्वाच्या कार्यासाठी मिळणारी ही साथ कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढवणारी ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. हिंदुत्वाचा विचार, कार्यकर्त्यांची एकजूट आणि ठाम भूमिका या मुद्द्यांवर झालेली संतोष ब्राम्हणे यांची अविष्कार भाऊ भुसे यांच्यासोबतची ही सदिच्छा भेट चर्चेचा विषय ठरली.

(पान १ वरून)

### जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी आणखी पाच जागा बिनविरोध, बारा जागांसाठी होणार चुरशीची लढत

मुदत होती. तत्पूर्वी मंगळवारी दसऱ्याच्या मुहूर्तावर नगरच्या शासकीय विश्रामगृहावर विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत दुपारी तीन ते सायंकाळी सहा या तीन तासांच्या कालावधीत झालेल्या बैठकीत दीर्घ चर्चा झाली. यावेळी खा. नीलेश लंके, माजी मंत्री शंकरराव गडाख, आमदार आशुतोष काळे, आमदार मोनिका राजळे, आमदार किरण लहामटे, आमदार विक्रम पाचपुते, आमदार हेमंत ओगले, आमदार विवेक कोल्हे, आमदार प्राजक्त तनपुरे, आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, माजी आमदार वैभव पिचड, बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम गायकर, माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले, माजी संचालक भानुदास मुरकुटे, करण ससाणे, राजेंद्र नागवडे, अंबादास पिसाळ, प्रताप ढाकणे, सुजित झावरे, अमित भांगरे यांच्यासह बँकेसाठी इच्छुक असणारे तालुका पातळीवरील नेते उपस्थित होते. दरम्यान, अंतिम निर्णय घेण्यासाठी राष्ट्रवादीचे खासदार निलेश लंके यांच्या वतीने आज नगरमध्ये सकाळी प्रताप ढाकणे यांच्या निवासस्थानी बैठक झाल्याचे समजले.

### चुकीच्या मार्गाने जाऊ नका - आमदार संग्राम जगताप

असे त्यांनी सांगितले. श्री तुळजाभवानी माता मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या ठिकाणी भाविक एकत्र येऊन धार्मिक उत्सव उत्साहात साजरे करतात आणि एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण करतात. अशा कार्यक्रमांमुळे संत-महंतांच्या विचारांची तसेच सण-उत्सवांच्या परंपरेची जपणूक होते. देवस्थानच्या वतीने विचार भारतीचे संस्थापक राजाभाऊ मुळे यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याची समाजाला ओळख करून देण्यात आली आहे. त्यांनी चांगली माणसे घडविण्याचे आणि हिंदू धर्माचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले आहे. हे कार्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे, असे आमदार जगताप म्हणाले.

देवस्थानचे संस्थापक अशोक कानडे यांनी सर्वांना सोबत घेऊन धार्मिकतेचे कार्य सुरू केले . त्यांच्या या कार्याला आपले नेहमीच सहकार्य राहील, अशी ग्वाहीही आमदार संग्राम जगताप यांनी दिली. पुरस्कारप्राप्त राजाभाऊ मुळे म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०१ वर्षे पूर्ण झाली आहेत. आपण वयाच्या पाचव्या वर्षापासून संघाच्या शाखेत जात आहोत. 'शिवशंभू हिंदू धर्मरक्षक पुरस्कार' हा श्री तुळजाभवानी मातेचा प्रसाद म्हणून स्वीकारला असून, तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला समर्पित करीत आहोत. हिंदू धर्माचे कार्य समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले जात आहे. समाजात एक चांगली आणि सुसंस्कृत पिढी निर्माण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे, असे त्यांनी सांगितले.

देवस्थानचे संस्थापक अशोक कानडे म्हणाले की, श्री तुळजाभवानी माता मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान असून, येथे वर्षभर विविध धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. पाइपलाइन रोड येथील श्री तुळजाभवानी मंदिराच्या वतीने शहरात पहिल्यांदा हिंदू धर्मसभेच्या आयोजनाला सुरुवात करण्यात आली. या धर्मसभेत हिंदू धर्मासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'शिवशंभू हिंदू धर्मरक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येते. नवरात्रोत्सवाच्या दहा दिवसांत विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांना भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक उपक्रमांचा आनंद घेतात, असे अशोक कानडे यांनी सांगितले.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, माजी सभागृह नेते रवींद्र बारस्कर, निखिल वारे, करण कराळे, सोमनाथ जाधव, युवराज चव्हाण, पुष्कर कुलकर्णी, संपत नलावडे, राहुल जामगावकर, प्रा. अशोक साबळे, रोहन सानप, अशोक गायकवाड, सुधीर लांडगे, राजेंद्र पाचे, प्रशांत भालेराव, ओमप्रकाश तिवारी, नवनाथ आंधळे, स्मिता शितोळे, दत्तात्रय तांबे, सागर पुंड, भगवान राऊत, सुनीता कानडे, लतिका पवार यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### न्यायालयाच्या आदेशानंतरही वाहन अन् मोबाईलसाठी चिचोंडी पाटीलच्या सरपंचाचे पोलीस ठाण्याचे हेलपाटे

त्यांनी केला असून, या प्रकरणात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. पवार यांच्या तक्रारीनुसार, मे महिन्यात नगर तालुका पोलीस ठाण्यात या गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांचे वाहन आणि मोबाईल पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यानंतर संबंधित वस्तू परत मिळाव्यात यासाठी त्यांनी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण केली. त्यामुळे त्यांना आपल्या वस्तू परत मिळणे अपेक्षित होते. परंतु न्यायालयाच्या आदेशानंतरही वाहन आणि मोबाईल परत मिळत नसल्याचे पवार यांनी तक्रारीत म्हटले आहे.